# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यात क्षयरोगामुळे मृत्यूचे प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(१) ३८७ (१८-०३-२०२०) श्री.विलास पोतनीस, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१८ मध्ये ६,४७६ जणांचा क्षयरोगामुळे मृत्यू झाला असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केलेल्या माहितीमध्ये प्रसिध्द केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई शहर व उपनगरात गेल्या वर्षभरात ४९ हजार २४२ रुग्णांची नोंद करण्यात आल्याचे प्रजा फाऊंडेशनने केलेल्या सर्व्हेक्षणात माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून मुंबई शहरामध्ये कुर्ला, सांताक्रुझ व मालाड परिसरातही क्षय रुग्णांची संख्या जास्त असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१७-२०१८ च्या तुलनेत सन २०१९ मध्ये राज्यात क्षयरोगाच्या रुग्णांची मृत्यूची सरासरी २८ टक्क्यांनी वाढली असून दररोज १७ जणांचा क्षयरोगाने मृत्यू होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, क्षयरोग रुग्णांना योग्यवेळी वैद्यकीय उपचार न मिळणे, औषधांची उपलब्धता नसणे तसेच वैद्यकीय उपचार अर्धवट सोडल्यामुळे राज्यातील क्षयरोग रुग्णांच्या मृत्यूचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील क्षयरोग नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२४-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१८ मध्ये क्षयरोगामुळे मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या ६९५१ इतकी आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१९ मध्ये घाटकोपर, दादर आणि मालाड परिसरात अधिक क्षयरुग्णांची नोंद झाल्याचे दिसून आले आहे

(३) हे अंशत: खरे आहे.

- सन २०१७ मध्ये ५४२४, सन २०१८ मध्ये ६९५१ व सन २०१९ मध्ये ७७८३ क्षयरोगामुळे मृत्यू झालेले आहेत.
- सन २०१८ मध्ये सन २०१७ च्या तुलनेत सरासरी २८ टक्क्यांनी वाढ झालेली आहे.
- सन २०१९ मध्ये सन २०१८ च्या तुलनेत सरासरी १२ टक्क्यांनी वाढ झालेली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) क्षयरोगावर नियंत्रण करण्याकरीता राज्यात खालील उपाययोजना राबविण्यात येतात.

१) क्षयरोगाचे सनियंत्रण करण्यासाठी राज्यात ३४ जिल्हा क्षयरोग केंद्रे व ४६ शहर क्षयरोग केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. तसेच ५२९ क्षयरोग पथक (टीयू) कार्यरत आहेत.

२) संशयित क्षयरुग्णांचा थुंकी नमुना तपासणीसाठी राज्यात १९३५ मान्यता प्राप्त सूक्ष्मदर्शीकेंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत.

३) क्षयरोगाचे लवकर निदान होण्यासाठी राज्यात सर्व जिल्हयात एकूण १३१ CBNAAT यंत्रे उपलब्ध केली आहेत.

४) नियमित औषधोपचारास जे रुग्ण दाद देत नाहीत अशा संशयित एम.डी आर/ एक्स.डी.आर. क्षयरुग्णांची तपासणी व निदान करण्यासाठी राज्यात १२ कल्चर ॲण्ड डी.एस.टी. प्रयोगशाळा केंद्र शासनामार्फत प्रमाणित करण्यात आलेले आहेत.

५) एन.जी.ओ., पी.पी.योजना- राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी ७५ अशासकीय संस्थांमार्फत विविध स्वरुपाचे कामे केली जातात. (क्षयरुग्ण शोधणे, उपचार करणे, चाचण्या करणे, क्षयरोगाची माहिती व शिक्षण देणे, इ.)

६) निक्क्षय पोषण आाहार (डिबीटी)- महाराष्ट्र राज्यात १ एप्रिल, २०१८ पासून क्षयरुग्णांना निक्क्षय पोषण आहार योजनेंतर्गत दरमहा ५०० रुपये क्षयरुग्णांच्या बँक खात्यात थेट उपचार चालू असेपर्यंत वर्ग करण्यात येतात.

७) शासकीय अधिकारी व कर्मचारी व्यतिरिक्त केंद्र शासनाने क्षयरोगावर नियंत्रण करण्यासाठी राज्यात करारतत्त्वावर एकूण २२८१ अधिकारी व कर्मचारी वर्ग मंजूर केला आहे.

८) पी.पी.एस.ए. (PPSA) :- २०१९-२०२० च्या मंजूर कृती आराखड्यामध्ये खाजगी वैद्यकीय क्षेत्रातील क्षयरुग्णांचे व्यवस्थापन करण्यासाठी जीत प्रकल्प अंतर्गत असलेल्या महानगरपालिका (औरंगाबाद मनपा, कल्याण मनपा, नवी मुंबई मनपा, ठाणे मनपा, भिवंडी मनपा, मिरा भाईंदर मनपा, वसई विरार मनपा, नाशिक मनपा, कोल्हापूर मनपा, पुणे मनपा, पिंपरी चिंचवड मनपा, सोलापूर मनपा) व १ जिल्हा (रायगड) यामध्ये PPSA प्रकल्प राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणार आहे.

९) पोषण पुनर्वसन केंद्र (एन.आर.सी.):- राज्य शासनातर्फे पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये भरती होणाऱ्या बालकांची नियमितपणे क्षयरोगासाठी चाचणी करण्यात येते.

१०) सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहिम राज्यामध्ये केंद्र सरकारच्या निर्देशक मध्ये २०१७ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये जोखमीच्या कालावधीमध्ये उदा. झोपडपट्टी, दुर्गम भाग, आश्रमशाळा, तुरुंग, स्थलांतरीत

वस्ती इ. ठिकाणी प्रशिक्षण पथकाद्वारे गृहभेटीतून संशयीत क्षयरुग्ण शोधण्यात येतात व त्यांच्या आजाराचे निदान करण्यात येते.

११) तपासणीत आढळलेल्या एम.डी.आर/ एक्स.डी.आर. क्षयरुग्णांच्या प्रयोगशाळा चाचण्या करुन पुढील औषधोपचार डी.आर.टी.बी. सेंटरमध्ये तज्ञांचे मार्गदर्शनाखाली सुरु करावे लागतात. राज्यात १९ नोडल डी.आर.टी.बी. सेंटर कार्यरत आहेत. तसेच जिल्हास्तरावर ३१ डी.आर.टी.बी. सेंटर कार्यरत आहेत.

---

## राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना आवश्यक मदत करण्याबाबत

**(२) ४९३ (१८-०३-२०२०) श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढण्याची गरज असून या समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण पैशाअभावी थांबू नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(२) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (२४-११-२०२१) :** (१) अल्पसंख्याक विकास विभागातर्फे "उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती" योजना, तसेच निवासी मदरशांमध्ये राहून धार्मिक शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींना मुख्य प्रवाहातील शिक्षण मिळावे, यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणासोबतच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दु या विषयांचे शिक्षण देणाऱ्या ३ शिक्षकांच्या नियुक्तीसाठी अनुदान देण्याची डॉ.झाकीर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजनेंतर्गत, त्याचप्रमाणे अल्पसंख्याक बहुल विद्यार्थी असलेल्या शाळांमधील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण मिळावे, यासाठी अशा शाळांना पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येते.

तसेच अल्पसंख्याक संवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे बांधण्यात आली असून, या वसतिगृहामध्ये रुपये ८.०० लाख पेक्षा कमी वार्षिक कौटुबिंक उत्पन्न असलेल्या अल्पसंख्याक संवर्गातील विद्यार्थ्यांना वसतिगृहात पुरविण्यात येणाऱ्या सुविधांचे शुल्क पूर्णपणे माफ असते. तसेच या विद्यार्थ्यांच्या आहाराकरीता रुपये ३,०००/- ते रुपये ३,५००/- प्रती माह इतकी रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा शासन निर्णय दिनांक १२/१०/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे मौलांना आझाद आर्थिक विकास महामंडळामार्फत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत कर्ज योजना राबविण्यात येते. केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास कार्य मंत्रालयामार्फतही शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्री पितांबर महाराज संस्थान, कोंडोली (ता.मानोरा, जि.वाशिम) या ग्रामीण तीर्थक्षेत्रास निधी मिळण्याबाबत

**(३) १८७२ (१८-०३-२०२०) श्री.प्रविण दरेकर** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री पितांबर महाराज संस्थान, कोंडोली (ता.मानोरा, जि.वाशिम) या स्थानास ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत दिनांक ५ जून, २०१७ रोजी वर्ग “ब” दर्जा दिल्यानंतर दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये २ कोटीचा शासनाने निधी मंजूर केल्यानंतर तीर्थक्षेत्राच्या विकासासंदर्भातील बांधकाम हाती घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीर्थक्षेत्राचे ९० टक्के बांधकाम पूर्ण झालेले असतानाही शासनाने मंजूर केलेल्या रुपये २ कोटी निधीचे वितरण केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निधी वितरीत न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मंजूर केलेला निधी विनाविलंब वितरीत करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२४-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे. सदर तीर्थक्षेत्राच्या भक्तनिवास बांधकामाचे देयक शासनास प्राप्त झाले असून निधी उपलब्धतेनुसार स्थूल रकमेच्या ५०% निधी जिल्हा परिषद, वाशिम यांना वितरीत केला आहे. उर्वरित कामांची देयके अद्याप शासनास अप्राप्त आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिव्यांगांच्या निवृत्तीवेतनासाठी अकार्यक्षतेचा दाखला सादर करण्याच्या अटीबाबत

**(४) १९९३ (१८-०३-२०२०) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिव्यांगाच्या निवृत्तीवेतनासाठी अकार्यक्षतेचा दाखला सादर करण्याची अट कल्याण-डोंबिवली महापालिकेने माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान वगळली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे किती दिव्यांगाना त्याचा लाभ मिळणार आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१५-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) दिनांक १२/०८/२०२० पर्यंत ५६५ दिव्यांगांना पेंशन योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानाचा वाढीव टप्पा देणेबाबत

**(५) २८८४ (२८-०५-२०२०) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे, श्री.कपिल पाटील, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आणि वर्ग तुकड्यांवरील शिक्षक कर्मचाऱ्यांना दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ नुसार २० टक्के वेतन अनुदान देण्यात येत असून दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शालेय शिक्षण विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार अनुदानास पात्र सर्व शाळा, वर्ग तुकड्या व कनिष्ठ महाविद्यालयांना दिनांक ०१ एप्रिल, २०१९ पासून अनुदानाचा वाढीव टप्पा देणेबाबत शासनाने आर्थिक तरतूद करुन शिक्षक-कर्मचार्यांचे वेतन नियमित सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २० टक्के अनुदान घेत असलेल्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुढील अनुदानाचा वाढीव टप्पा न मिळाल्याने वाढीव टप्पा देणेबाबत मागणी केली असून अनुदानासाठी मुल्यांकनाचे निकष पूर्ण केलेल्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व सन २०१२-२०१३ च्या वर्ग तुकड्यांना अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, राज्यात मागील १५ वर्षापासून अनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामधील विनाअनुदानित शाळा व तुकड्यांवर काम करणाऱ्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २० टक्के अनुदानावरुन १०० टक्के अनुदान देण्याबाबत सभागृहात घोषणा करण्यात आली असून अनुदान मंजूर असून देखील अनुदान वितरणाचा आदेश न निघाल्यामुळे जवळपास ४५ हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वेतनापासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुदान पात्र घोषित शाळांमधील वर्ग तुकड्यांना तसेच उच्च माध्यमिक शाळांमधील नैसर्गिक वाढीच्या वर्ग तुकड्यांना वेतन अनुदान वितरित करण्यात आले नसल्याने याप्रकरणी नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री व मा.वित्तमंत्री यांना

दिनांक ०४/०४/२०२०, ०६/०४/२०२० आणि १९/०४/२०२० रोजी निवेदन पाठवून तात्काळ वेतन अनुदान वितरीत करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळा व तुकड्यांना पुढील अनुदानाचा वाढीव टप्पा देवून वेतन अनुदाना अभावी उपासमारीची वेळ आलेल्या शिक्षकांना आश्वासनानुसार वेतन अनुदान वितरीत करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-११-२०२१)** : (१) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक १३/०९/२०१९ अन्वये, राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतन अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आले आहे. मात्र, शासन निर्णय, दिनांक १३/०९/२०१९ मधील अटी ह्या जाचक असल्याचे विविध संघटना व शिक्षक प्रतिनिधी यांनी शासनाच्या निदर्शनास आणून, सदर अटी रद्द कराव्यात अशी विनंती मा.मुख्यमंत्री/ मा.उप मुख्यमंत्री यांचेकडे केली. त्यास अनुसरुन मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ समिती गठीत करण्यात आली. मंत्रिमंडळ समितीने सादर केलेला अहवाल दिनांक १४/१०/२०२० च्या मंत्रिमंडळ बैठकीत ठेवून, शासन निर्णय, दिनांक १३/०९/२०१९ मधील काही अटी व शर्तीमध्ये शासन निर्णय, दिनांक ०४/१२/२०२० अन्वये सुधारणा करण्यात आली.

त्यानुसार, तपासणीत पात्र ठरलेल्या शाळांना दिनांक १२, १५ व २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये अनुदानास पात्र घोषित करून, दिनांक ०१/११/२०२० पासून २० टक्के व यापूर्वी २० टक्के अनुदान घेत असलेल्या शाळा, वर्ग तुकड्या, कनिष्ठ महाविद्यालयांना वाढीव २० टक्के अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे.

(२), (३) व (४) सन २०१२-१३ च्या अघोषित वर्ग तुकड्यांना अनुदानास पात्र घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त (शिक्षण) यांचेकडून मागवण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत, शासन निर्णय, दिनांक १३/०९/२०१६ नुसार सरसकट २० टक्के वेतन अनुदान देण्याचे शासनाचे धोरण आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शासन निर्णय दिनांक १२, १५ व २४ फेब्रुवारी, २०२१ नुसार राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना २० टक्के व वाढीव २० टक्के वेतन अनुदान दिनांक ०१/११/२०२० पासून मंजूर व अदा करण्यात आले आहे.

---

## ठाणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील रिक्त पदांबाबत

**(६) ३१४८ (०२-०६-२०२०) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील पाच तालुक्यातील जिल्हा परिषदेंतर्गत ३३ प्राथमिक आरोग्य केंद्र, १९० उपकेंद्र कार्यरत असून जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेवांचा लाभ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण आणि दुर्गम भागातील ग्रामस्थांपर्यंत मिळत असतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य विभागाकडून एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत पूरक पोषण आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, संदर्भ सेवा, आरोग्य व सकस आहार विषयक शिक्षण, पूर्व प्राथमिक शिक्षण अशा महत्त्वाच्या योजना राबविल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागातील अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा माता संगोपन अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी, सांख्यिकी अधिकारी व मुख्यपदासह वैद्यकीय अधिकारी ११, आरोग्य पर्यवेक्षक ३, आरोग्यसेवक पुरुष ३२, औषध निर्माण अधिकारी ६, प्रयोगशाळा

तज्ञ ४ अशी एकूण १३३ पदे रिक्त असून मंजूर पदांपैकी भरलेली २१३ पदे असून त्यापैकी २२ कर्मचारी हे पालघर येथे कार्यरत असल्याने या २२ कर्मचाऱ्यांचा अतिरिक्त भारदेखील कार्यरत कर्मचाऱ्यांवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे जिल्हयातील समस्यांचा आढावा घेण्यासाठी मा.मुख्यमंत्र्यानी माहे मार्च, २०२० च्या पहिल्या आठवड्यात विधान भवनात आयोजित केलेल्या बैठकीच्यावेळी ठाणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांनी आरोग्य विभागातील सर्व रिक्त पदे भरण्याबाबतचे एक निवेदन मा.मुख्यमंत्र्यांकडे सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निवेदनातील मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२३-११-२०२१) :** (१), (२), (३) व (४) होय हे खरे आहे.

(५) जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या स्वतंत्र निवड मंडळामार्फत कार्यवाही सुरु आहे.

तसेच पदोन्नतीच्या कोटयातील पदे भरण्यासाठी अंतिमीकरणाची कार्यवाही आयुक्त आरोग्य सेवा आयुक्तालयस्तरावरुन सुरु आहे.

जिल्हा परिषदेकडील गट क व ड संवर्गाची पदे जिल्हा परिषदेमार्फत ग्रामविकास विभागाच्या निर्देशानुसार भरण्यात येतात.

---

## राज्यातील खाजगी डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी न करता कोरोना चाचणी करण्याची चिट्टी दिल्याबाबत

**(७) ३९२९ (०९-०९-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय किंवा खाजगी प्रयोगशाळांमध्ये कोरोना चाचणी करण्यासाठी डॉक्टरांची चिठ्ठी असणे बंधनकारक असतानाही नियमांचे उल्लंघन करुन काही खाजगी डॉक्टरांनी शारीरिक तपासणी केल्याशिवाय कोरोना चिठ्ठी दिल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही ठिकाणी तर दुसऱ्या राज्यातील डॉक्टरांची चिठ्ठी दाखवून खाजगी प्रयोगशाळांमध्ये तपासणी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी खाजगी डॉक्टरांची वैद्यकीय नोंदणी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यानुसार किती खाजगी वैद्यकीय डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-११-२०२१) :** (१) हे खरे नाही. मे महिन्यादरम्यान अशी तक्रार प्राप्त नाही.

केंद्र शासनाच्या दिनांक ०१ जुलै, २०२१ रोजीच्या पत्रान्वये कोरोना चाचणी करण्यासाठी शासकीय किंवा खाजगी प्रयोगशाळांमध्ये डॉक्टरांची चिठ्ठी असणे बंधनकारक नाही. रुग्णाचे लवकर निदान व्हावे व त्यास त्वरित उपचार मिळावेत यासाठी रुग्णास कोरोनाची लक्षणे असतील तर तो व्यक्तीश: प्रयोगशाळेत जाऊन तपासणी करु शकतो, व संबंधित प्रयोगशाळा त्या व्यक्तीची तपासणी करु शकते.
(२) अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात महसुली तूट असताना लॉकडाऊनच्या काळात कोट्यवधीच्या कामांना मंजुरी देण्यात आल्याबाबत

**(८) ४००९ (०९-०९-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना सारख्या संकटाने राज्यात महसुली तूट असताना लॉकडाऊनच्या काळात कोट्यवधीच्या कामांना मंजुरी देण्यात आल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, दिनांक ३० मार्च, २०२० रोजी ग्रामविकास विभागाने दोन वेगवेगळे आदेश काढले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१०-११-२०२१) :** (१) सन २०१९-२० या आर्थिक वर्षात निधी उपलब्धतेनुसार मूलभूत सुविधांच्या कामांना मंजूरी दिली आहे.
(२) शासन मान्यतेनुसार जिल्हानिहाय स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंतप्रधान किसान योजनेतील नोंदणीकृत शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड वाटप करण्याबाबत

**(९) ४०२३ (०९-०९-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान किसान योजना परिणामकारकपणे करण्यासाठी योजनेतील नोंदणीकृत शेतकऱ्यांना 'केसीसी' (किसान क्रेडिट कार्ड) वाटपाचे आदेश केंद्र शासनाने दिले असून 'किसान क्रेडिट कार्ड' दिल्यास शेतकऱ्यांना तीन लाखापर्यंतचे कर्ज व इतर लाभ मिळू शकतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, 'किसान क्रेडिट कार्ड' साठी राज्यातील ३३ लाखाहून जास्त शेतकऱ्यांनी अर्ज केली असताना बँकांनी फक्त दोन लाख शेतकऱ्यांना 'केसीसी' वर कर्ज वाटल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांची गैरसोय दूर होण्यासाठी शासनाने बँक प्रशासन आणि राज्य शासन यांच्यात संयुक्तरित्या समन्वय साधून प्रलंबित किसान क्रेडिट कार्ड वाटणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१२-११-२०२१) :** (१) होय.

(२) सहकार आयुक्त कार्यालयाकडून ऑक्टोबर, २०२० च्या प्राप्त अहवालानुसार किसान क्रेडीट कार्डसाठी १७.५० लाख अर्ज प्राप्त झाले असून आतापर्यंत १६.७२ लाख अर्ज मंजूर करुन सदर लाभार्थ्यांना किसान क्रेडीट कार्ड वितरीत करण्यात आले आहेत.

(३) केंद्र शासनाकडील दिनांक ०६/०२/२०२० व राज्य शासनाकडील दिनांक ०७/०२/२०२० च्या सुचनेनुसार राज्यातील पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना लाभार्थ्यांना अल्पमुदत पीक कर्जासाठी किसान क्रेडीट कार्ड सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सुचना आहेत. सदर बाबत केंद्र शासन, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, राज्यस्तरीय बँकर्स समिती व सहकार आयुक्त कार्यालयाद्वारे सर्व विभागीय कार्यालयांना वेळोवेळी आवश्यक त्या सुचना दिलेल्या आहेत. तसेच व्हीसी द्वारे आढावा घेण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेंडगाव (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील कर्मयोगी श्री संत गाडगे महाराज जन्म स्थळाच्या विकासाबाबत

**(१०) ४६४६ (२२-०७-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेंडगाव (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील कर्मयोगी श्री संत गाडगे महाराज यांच्या जन्म स्थळाच्या विकासासाठी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी तीन कोटी ऐंशी लाख रुपयांचा विकास आराखडा दोन वर्षापुर्वी मंजूर केला

असून ही सदर या ठिकाणी काहीच विकास झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२६-११-२०२१) :** (१) हे खरे नाही. शेंडगाव येथील श्री संत गाडगे महाराज या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास रुपये १८.६३ कोटी इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रुपये ३.७३ कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, अमरावती यांना वितरीत केला आहे. सदर वितरीत निधीच्या अनुषंगाने काही कामे प्रगतीपथावर असून काही कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित निधी मागणीसाठी प्रस्ताव सादर केला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांचा “कायम” शब्द वगळून अनुदान मंजूर करण्याबाबत

**(११) ४७८६ (०८-१२-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कायम विनाअनुदानित तत्वावर अनेक वरिष्ठ महाविद्यालय सुरू असून कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचा “कायम” शब्द वगळून अनुदान मिळण्याबाबतचा प्रस्ताव फाईल क्र. इनजीसी/२०१०(३३/१०) माशि-४ हा असून सदरहू प्रस्ताव सन २०१४ रोजीच्या कॅबिनेट बैठकीत सादर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांचा कायम शब्द वगळून महाविद्यालयांना अनुदान मंजूर करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०६-१२-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) कायम शब्द वगळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील दिव्यांगाच्या अखर्चित निधीबाबत

**(१२) ५१०३ (१४-१२-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद परभणीच्यावतीने दिव्यांग व्यक्तींसाठी उपलब्ध झालेल्या तीन कोटी रूपयांचा निधी अखर्चित राहिल्याबाबत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, परभणी व समाजकल्याण अधिकारी, परभणी यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जिल्हा परिषद उपाध्यक्ष, परभणी यांनी सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा.सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी या प्रकरणी अपंग कल्याण आयुक्त यांच्यास्तरावरून चौकशी करण्याबाबतचे आदेश जारी केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१५-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे

(२) होय, मा.मंत्री (सामाजिक न्याय विभाग) यांनी चौकशीबाबतचे आदेश जारी केले आहे.

(३) दिनांक २८/१२/२०२० रोजी च्या पत्रान्वये आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना उपरोक्त प्रकरणी खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी दिनांक २६/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये आपला खुलासा आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांना सादर केला आहे. आयुक्तालय स्तवरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील परळी औष्णिक विद्युत केंद्रात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१३) ५७३४ (१३-११-२०२०) श्री.संजय दौंड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित अंतर्गत बीड जिल्ह्यातील परळी औष्णिक विद्युत केंद्रात झालेल्या कोटयवधी रुपयांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी शासनाने संचालक (वित्त) विद्युत महानिर्मिती कंपनी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास समिती गठीत केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समितीने आपला अहवाल शासनास एक महिन्यात सादर करावयाचा असल्याने प्रस्तुत समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, तसेच सदर समितीमध्ये कोणकोण सदस्य आहेत,
(३) असल्यास, सदर अहवालात काय नमूद केले आहे व उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१८-११-२०२१) :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या., अंतर्गत बीड जिल्ह्यातील परळी औष्णिक विद्युत केंद्रात झालेल्या कोट्यावधी रूपयांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी संचालक (वित्त), महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या., यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली आहे. सदर समितीमध्ये कार्यकारी संचालक (सं. व सु-१ व २) व मुख्य अभियंता (कार्य) या सदस्यांचा समावेश आहे.

चौकशी समितीने महानिर्मिती कंपनीला अहवाल सादर केला आहे. चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार स्वतंत्रपणे पुढील कार्यवाही करण्याची प्रक्रिया महानिर्मिती कंपनीस्तरावर सुरू आहे.

सद्य:स्थितीत मे थर्मल पॉवर स्टेशन सप्लायर्स व कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन, परळी यांचेकडून मा.मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्र. ७००/२०२० संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

## लातूर (ता.जि.लातूर) येथे आशा सेविकेला मारहाण झाल्याबाबत

**(१४) ५७७३ (१३-१२-२०२०) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर (ता.जि.लातूर) येथील कानडी बोरगाव येथे आशा सेविकेला शिवीगाळ करुन मारहाण करण्यात आल्याची घटना दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आशा सेविकांना मारहाण करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२६-११-२०२१) :** (१) कानडी बोरगाव (जि.लातूर) येथे आशा सेविकेस शिवीगाळ करुन त्यांच्या पतीस मारहाण केल्याची घटना दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२० रोजी घडली आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, मुरुड येथे एन.सी.नं.४१०/२०२० भा.दं.वि.स. कलम ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) पोलीस स्टेशन, मुरुड येथे आरोपीविरुध्द अदखलपात्र गुन्हा दाखल करुन त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही नं.१७७/२०२० कलम १०७ फौ.प्र.स. प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर आरोपीकडून तहसिलदार, लातूर यांनी ५०००/- रुपये रकमेचे बंधपत्र घेतले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## राज्यातील ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१५) ५७७५ (१४-१२-२०२०) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या ग्रामीण आरोग्य अहवालानुसार माहे जानेवारी, २०२० मध्ये ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांची ५० टक्के तर प्राथमिक आरोग्य केंद्रात ७ टक्के पदे रिक्त असल्यामुळे ग्रामीण जनतेला अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने ग्रामीण भागातील वैद्यकीय केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या ग्रामीण आरोग्य अहवालानुसार ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांच्या पदांची कमतरता आहे तर प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर डॉक्टरांची कमतरता नाही. तसेच निमवैद्यकीय पदांची कमतरता आहे.
(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ ची पदे भरण्याबाबत विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग, जाहिरात क्र.०१/२०२१ व जाहिरात क्र. ०२/२०२१ नुसार एकूण १८२६ वैद्यकीय अधिकारी, गट-अ यांची भरती केली आहे.

रुग्णसेवेशी संबंधित गट-क व गट-ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याची विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंठा (जि.जालना) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयामधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) ७७८२ (१४-१२-२०२०) श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंठा (जि.जालना) तालुक्यातील उप जिल्हा रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची व वैद्यकीय कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उप जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-११-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

मंठा जि.जालना येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय असून त्याठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर कार्यान्वित आहे. सदर रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षकसह वैद्यकीय अधिकारी गट-अ ची एकूण ९ पदे भरलेली आहेत. दंतशल्यचिकित्सक वर्ग-२ चे १ पद रिक्त आहे. तसेच वर्ग-३ ची १३ पदे भरलेली व ७ पदे रिक्त आहेत व वर्ग-४ ची ७ पदे भरलेली व ५ पदे रिक्त आहेत.
(२) गट-क व गट-ड ची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात अत्यावश्यक सेवेत काम करणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(१७) ५९९२ (१७-११-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अत्यावश्यक सेवेत काम करणाऱ्या अनेक अधिकारी/ कर्मचारी यांचा कोविड-१९ या आजारामुळे मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्यावश्यक सेवेमध्ये काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबियांना शासनाने किती आर्थिक मदत केली आहे वा कोणत्या स्वरुपाची,

(३) असल्यास, कोविड-१९ च्या काळात सेवा करणाऱ्या डॉक्टर, नर्सेस, पोलीस यांसह इतर शासकीय कार्यालयात काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी शासनाने कोणती विशेष योजना तयार केली आहे व तिचे स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोविड-१९ च्या आजारामुळे मृत पावलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०२-१२-२०२१) :** (१) होय.

(२), (३) व (४) वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २९/०५/२०२० अन्वये कोव्हिड विषाणूच्या सार्वत्रिक साथीच्या अनुषंगाने सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार व मदत कार्य या कार्यवाहीशी संबंधित कर्तव्यावर कार्यरत शासकीय कर्मचाऱ्यांच्या कोव्हिडमुळे झालेल्या मृत्यूच्या प्रकरणी रुपये ५० लक्ष रकमेचे सानुग्रह सहाय्य देण्यात येत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत

**(१८) ६१०० (१३-१२-२०२०) श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रसाद लाड, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणाच्या कॅनॉलसाठी संपादित केलेल्या जमिनींचा पूर्ण मोबदला मागील ३० वर्षापासून देण्यात आला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना किती मोबदला देण्यात आला आहे व किती शेतकरी भूसंपादनाच्या मोबदल्यापासून वंचित राहिले आहेत, त्याची सविस्तर माहिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोलापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१६-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) दिनांक ०६/०६/२००६ चे शासन परिपत्रकानुसार पंढरपूर तालुक्यातील ११३७ लाभधारक शेतकऱ्यांची १३७ हे. व मंगळवेढा तालुक्यातील १०५३ लाभधारक शेतकऱ्यांची १९८ हे. जमीन संपादीत करुन संबंधीतांना रुपये ३१.४३ कोटी मोबदला अदा केला आहे. नवीन २०१३ चे कायद्यानुसार मे-२०२१ अखेर पंढरपूर तालुक्यातील २८७ लाभधारक शेतकऱ्यांची ३४.९५ हे. व मंगळवेढा तालुक्यातील ८२० लाभधारक शेतकऱ्यांची ११८.०४ हे. जमीन संपादीत करण्यात आली आहे व रुपये ६१.७८ कोटी अदा केले आहेत. उर्वरित पंढरपूर तालुक्यातील ४० प्रस्तावांचे मुल्यांकन करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) पंढरपूर तालुक्यातील १९ गावांचे ४० प्रस्तावांचे मुल्यांकन करण्याचे काम महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५, दिनांक ३०/०९/२०१५ व दिनांक १५/०१/२०१७ चे तरतुदीनुसार मुल्यांकन तयार करुन

त्यास जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीचे बैठकीत मंजूरी घेऊन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने भूसंपादन करणेत येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंगापूर (ता.जि.सातारा) ग्रामपंचायत अंतर्गत करण्यात आलेल्या कामकाजाच्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

**(१९) ६११४ (२३-११-२०२०) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत अंगापूर (ता.जि.सातारा) अंतर्गत करण्यात आलेल्या रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची असून त्यासह अन्य विकास कामाची मोजमापे कधी घेतली, याबाबत नोंद नसणे तसेच त्यावर कोणाची स्वाक्षरी नसणे, कामाच्या निविदा, तुलनात्मक तक्ते, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता करारनामे, वृत्तपत्र जाहिराती व ई-टेंडर प्रक्रिया पार न पाडता मर्जीतील ठेकेदारांना कामे देण्यासंदर्भात शासन नियमांचे पालन न झाल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीकडून करण्यात आलेल्या बांधकामापैकी अंग्लाई देवी मंदिराशेजारी संरक्षक भिंत बांधणे या कामास उपअभियंता यांनी रुपये २,२३,२११/- इतक्या रकमेस मान्यता देऊन त्याबाबतचा जावक क्रमांक न देता पुन्हा नावात बदल करुन तेच काम मारुती मंदिरास संरक्षक भिंत बांधण्यासाठी सदर उपअभियंता, यांनी रुपये २,२३,०७५/- रकमेस तांत्रिक मान्यता देण्यात आल्याचे तसेच बाजार पटांगणे/गणेश मंदिर येथे पाणी टाकी बांधकाम करणे या कामासाठी तांत्रिक मान्यता न घेता तसेच अंदाजपत्रक न करता रुपये १,९२,९५३/- ठेकेदारास अदा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तेथील ग्रामस्थांनी संबंधितांविरुध्द चौकशी करुन कारवाई करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन विभागीय आयुक्त, पुणे यांना तसेच प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडे दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा यांच्याविरुध्द कारवाई करण्याची मागणी केली असताना सुध्दा कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२६-११-२०२१) :** (१) होय.

तक्रारदार श्री.प्रविण अंकुश कणसे यांच्या दिनांक ३१/१/२०२० च्या तक्रार अर्जास अनुसरुन गटविकास अधिकारी, वाई यांनी चौकशी करुन अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार अंगापूर वंदन ग्रामपंचायतीमध्ये १४ वा वित्त आयोग निधी मधून विविध कामे करताना ग्रामपंचायतीने जाणिव पुर्वक ई.निविदा करणेबाबत टाळाटाळ करणे, काम नोंदणीकृत ठेकेदारास न देता स्थानिक ठेकेदारास देणे, कामांची अंदाजपत्रके तांत्रिक मान्यता नसताना केवळ मोजमाप पुस्तकाच्या आधारे कामाचे देयक अदा करणे इ. प्रशासकीय व आर्थिक अनियमितता केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय.

१४ वा वित्त आयोग निधीतून हाती घेणेत आलेल्या अंग्लाईदेवी मंदिरा शेजारी संरक्षण भिंत बांधणे या कामासाठी १) अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,२३,२११/-, २) मारुती मंदिर बांधकाम करणे या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,२३,०७५/- अशी एकाच ठिकाणच्या कामाचे २ तुकडीकरण करुन हेतुपरस्पर ई-निवीदा करणेची प्रक्रीया संगनमताने टाळणेत आलेली आहे. तसेच, बाजार पटांगण/गणेश मंदिर पाणी टाकी बांधणे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,९२,९५३/- या कामाचे अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता नसल्याचे व मोजमाप पुस्तिकामध्ये नोंदी नसताना संबंधित मक्तेदार यांना देयक अदा केलेचे निदर्शनास आले आहे.

(३) होय.

तक्रारदार श्री.प्रविण अंकुश कणसे यांनी दिनांक ३१/०१/२०२० रोजी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडे निवेदन दिलेले होते. सदर निवेदन विभागीय आयुक्त कार्यालयाकडून सातारा जिल्हा परिषदेस दिनांक १४/०२/२०२० रोजीचे पत्रासोबत प्राप्त झालेले आहे.

(४) अशी बाब नाही.

सदर प्रकरणी चौकशीअंती ग्रामपंचायत अंगापूर वंदन ता.सातारा येथील १४ वा वित्त आयोगातील कामकाजातील प्रशासकीय व आर्थिक अनियमिततेसाठी सदर कालावधीतील ग्रामविकास अधिकारी व सरपंच हे जबाबदार असलेचे निदर्शनास आल्याने संबंधित ग्रामविकास अधिकारी श्री.एस.बी.जाधव यांना जि.प.सेवेतून निलंबीत करणेत आलेले आहे व तत्कालिन सरपंच श्री.सुरेश महादेव कणसे यांचेवर शासन परिपत्रक दिनांक ४ जानेवारी, २०१७ व शासन शुध्दीपत्रक दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ नुसार कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहराचा वीज पुरवठा काही काळासाठी खंडित झाल्याप्रकरणी शासनाने नेमलेल्या समितीच्या अहवालाबाबत

**(२०) ६६३८ (१५-०३-२०२१) श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पॉवर ग्रीडमध्ये व्यत्यय आल्यानंतर शहराचा वीज पुरवठा अबाधित राहण्यासाठी सन १९८१ पासून मुंबई आयलँडची सुविधा उपलब्ध असतानाही दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास सदरहू सुविधा कार्यान्वित न झाल्याने मुंबई शहराचा वीज पुरवठा काही काळासाठी खंडित झाल्याप्रकरणी तांत्रिक लेखापरीक्षण करण्यासाठी शासनाने मुंबई आयआयटीचे विद्युतअभियांत्रिकी शाखेचे विभाग प्रमुख श्री.बी.जी. फर्नांडीस यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीने दिनांक ५ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू समितीने अहवालात केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच सदरहू समितीने सादर केलेल्या शिफारशींपैकी कोणकोणत्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या असून त्यांच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१८-११-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) शहर व उपनगरीय क्षेत्रात दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी झालेल्या खंडित घटनेबाबत गठीत करण्यात आलेल्या तांत्रिक समितीने उपकरण देखभाल आणि स्थिती देखरेख, ग्रिड ऑपरेशन्स, आणीबाणी नियंत्रण, प्रणाली नियोजन, सरंक्षण आणि नियंत्रण प्रणाली, सिस्टम रिस्टोरेशन, प्रशिक्षण इत्यादीच्या अनुषंगाने पारेषण वाहिन्यांचे नियोजन, देखभाल, दुरुस्ती, आऊटेज, समन्वय अद्ययावत करण्याच्या संदर्भातील आहे. उक्त शिफारशींच्या अनुषंगाने अमंलबजावणीची कार्यवाही करण्यात आली/येत आहे. उक्त समितीचा अहवाल व त्यातील शिफारशी व त्या शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीचा कृती अहवाल (Action Taken Report) याबाबतचे सादरीकरण दिनांक २७/१०/२०२१ रोजी मंत्रीमंडळासमोर सादर करण्यात आले. मंत्रिमंडळाने उक्त समितीचा अहवाल व त्यातील शिफारशी व त्यावरील कृती अहवालाची नोंद घेतली.

---

## अधीक्षक, वेतन पथक (प्राथ) कार्यालय, नागपूर येथील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(२१) ८३७१ (१५-०३-२०२१) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अधीक्षक वेतन पथक (प्राथ), नागपूर यांनी विनाअनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना हयात नसलेल्या शिक्षणाधिकारी व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी यांच्या बनावट स्वाक्षरीच्या मान्यता असलेल्या प्रकरणात उपसंचालकाकडून शालार्थ आयडी प्राप्त करून सन २०१०-२०११ पासून अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी असतानासुध्दा वेतन अदा करीत असल्यासंबंधीच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी स्वत: व त्यांच्या पथकाने दिनांक २१/०७/२०१७ ते २३/०७/२०१७ या कालावधीत कार्यालयातील उपरोक्त व अन्य गैरव्यवहाराबद्दल चौकशी करुन प्रकरणातील गैरव्यवहाराकडे दुर्लक्ष होण्याकरीता आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये या प्रकरणात सहभागी असलेले शिक्षण उपसंचालक, नागपूर यांना चौकशी करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त गैरव्यवहाराला प्रोत्साहन देण्यासाठी व अन्य भ्रष्ट आर्थिक प्रकरणाकडे दुर्लक्ष करण्यासाठी शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी एक वर्षाचा कालावधी होवूनही वरिष्ठांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करुन अधीक्षक वेतन पथक (प्राथ), नागपूर यांची चौकशी करण्याकरीता विलंब करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार उच्चस्तरीय चौकशी समिती गठीत करुन सदरहू गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१) :** (१) अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) याप्रकरणी अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांची चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांना निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने

त्रिसदस्यीय समितीचा प्राथमिक चौकशी अहवाल आयुक्त (शिक्षण), पुणे कार्यालयास प्राप्त झाला असून संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश विभागीय उपसंचालक, नागपूर यांना देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील कोरोना रोगाचा प्रादुर्भाव कमी करुन जिल्हा रुग्णालयात आरोग्य कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२२) ८४१२ (१०-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील गाव व वाड्यावस्त्यांवर दररोज ६०० ते ८०० नव्या कोरोना बाधित रुग्णांची नोंद होत असल्याची बाब दिनांक ८ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही जिल्हयात गेल्या महिनाभरात मृत्यू दर वाढला असून जिल्हयातील रुग्णालयात कोरोना रुग्णांसाठी खाटा उपलब्ध नसून आरोग्य कर्मचाऱ्यांची संख्या अपूरी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील कोरोना रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्याबाबत तसेच जिल्हयातील रुग्णालयात कोरोना रुग्णांसाठी खाटा उपलब्ध करुन देण्याबाबत व आरोग्य कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १ ते ८ मे, २०२१ या आठवड्यात रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयांमध्ये आढळणारे सरासरी दैनंदिन कोविड रुग्ण अनुक्रमे ४६६ आणि ७२२ एवढे होते.

(२) माहे एप्रिल-मे या कालावधीतील सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा मृत्यूदर २.५२% तर रत्नागिरी जिल्ह्याचा मृत्यूदर १% एवढा होता.जिल्ह्यातील शासकीय व खाजगी रुग्णालयाच्या सहभागाने खाटा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(३) प्रत्येक जिल्ह्यातील कोविड-१९ परिस्थितीचा दैनंदिन आढावा राज्यस्तरावरुन घेण्यात येतो. यामध्ये -

१. आय.एल.आय/सारी सर्वेक्षण
२. प्रयोगशाळा चाचण्यांचे प्रमाण
३. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण
४. कॉन्टॅक्ट ट्रेसिंग
५. शेकडा मृत्यूदर

आदी बाबींचा आढावा घेवून त्यानुसार स्थानिक स्तरावरील उपाययोजना आखण्याबाबत सूचित करण्यात येते.

कोविड रुग्ण उपचारांसाठी त्रिस्तरीय रुग्णालय सुविधा दोन्ही जिल्ह्यात पुढीलप्रमाणे उपलब्ध आहे.

| जिल्हा | कोविड रुग्णालय | कोविड आरोग्य केंद्र | कोविड केअर सेंटर |
|---|---|---|---|
| रत्नागिरी | ६ | ३३ | ३४ |
| सिंधुदुर्ग | ६ | १४ | २७ |

सिंधुदुर्ग जिल्ह्यात वैद्यकीय अधिकारी गट अ मधील १५१ पैकी ८४ पदे भरण्यात आली. रत्नागिरी जिल्ह्यात जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडील गट अ मधील १२१ पदांपैकी ६९ पदे भरलेली आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दोन्ही जिल्ह्यांमध्ये विशेषज्ञांच्या कंत्राटी सेवा उपलब्ध करुन घेण्यात येत आहेत. रुग्णसेवा सुरळीत सुरु रहावी, यासाठी आवश्यक प्रयत्न करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात खाजगी लॅबधारकांकडून गरीब रुग्णांची आर्थिक लूट होत असल्याबाबत

**(२३) ८४५५ (१०-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.नरेंद्र दराडे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड-१९ संक्रमण काळामध्ये आर.टी.पी.सी.आर. अँटीजन, रक्त तपासणी चाचण्या कोरोना संसर्गाच्या निदानासाठी वापरल्या जात असताना शहरात नोंदणी नसलेल्या वैद्यकीय प्रयोगशाळा रुग्णांना अनेक तपासण्या करण्याची सक्ती करत असून चुकीचे कोरोना रिपोर्ट तसेच सिटी स्कॅन रिपोर्ट देऊन रुग्णांची लूट करीत असून बहुतांश भागात विशेषत: मुंबई, पुणे, पंढरपूर, नवी मुंबई, नांदेड व पाटण अशा ठिकाणी कोरोनाचे खोटे अहवाल देणे, रुग्णालयांची खोटी बिले बनविणे, वैद्यकीय अहवालावर आधारित विम्याची फाईल तयार करणे, विनाकारण चाचण्या करायला लावून खर्चास भाग पाडणे अशा तक्रारी महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टीसिन पॅथॅलॉजिस्ट आणि मायक्रो बायोलॉजिस्ट या संघटनेच्यावतीने दिनांक २१ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास सार्वजनिक आरोग्य विभागाकडे करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र वैद्यक व्यावसायिक अधिनियम १९६१ मधील तरतूदीनुसार नोंदणीकृत पॅथॅलॉजिस्टनी अहवालावर स्वाक्षऱ्या करणे व चाचणी प्रयोगशाळा (लॅब) चालवून चाचणी अहवाल वितरीत करणे हे वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांवर बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरातील “PH Diagnostics” मयूर कॉलनी, कोथरूड येथील खाजगी लॅबकडून रुग्णाचा HRCT Score Zero (०/२५) असून देखील १२ (१२/२५) score असलेला रिपोर्ट रुग्णाला देण्यात आल्यामुळे रुग्णाला खाजगी रुग्णालयात दाखल करून उपचारासाठी हजारो रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागल्याची तक्रार रुग्णांचे नातेवाईक श्री.खर्जे यांनी दिनांक ८ एप्रिल, २०२१ रोजी कोथरूड पोलीस स्टेशन, पुणे येथे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने २ महिने होऊनही अद्याप “PH Diagnostics” या खाजगी लॅबवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अशा फसवणूक करणाऱ्या लॅबधारकांवर तसेच वैद्यकीय प्रयोगशाळांचे चालक व तंत्रज्ञ यांच्यावर कारवाई करुन फसवणूक झालेल्या रुग्णाला त्याच्याकडून घेण्यात आलेल्या देयकाची रक्कम “PH Diagnostics” या खाजगी लॅबकडून वसुल करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२३-११-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

मुंबई, पुणे, नवी मुंबई, नांदेड व पाटण येथे अशा स्वरुपाच्या बाबी आढळून आल्या नाहीत. तथापि, पंढरपूर येथे श्री.आकाश गोरख अदमिले हे अधिकृत नोंदणी नसलेली लॅब चालवत असल्याने तालूका कोविड कृती समितीने दिनांक ०८/०४/२०२१ रोजी सदर लॅबवर कार्यवाही करुन आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ नुसार तहसिलदार पंढरपूर यांनी पंढरपूर पोलीस स्टेशन येथे संबंधितांवर गुन्हा दाखल केला आहे.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी खाजगी कोविड रुग्णालयांचे बिल तपासणीसाठी ऑडीटरची नियुक्ती केली असून जिल्ह्यातील सर्व खाजगी कोविड रुग्णालयांच्या बिलांचे ऑडिट करुन ज्या रुग्णालयाने जास्त शुल्क आकारले आहे त्यांना संबंधितांस जादा आकारलेले शुल्क परत करण्याबाबत आदेशित केले आहे.

PH Diagnostics या लॅब बाबत लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, सदर बाबत PH Diagnostics यांचेकडे लेखी खुलासा मागविण्यात आलेला होता. सदर खुलाश्यानुसार PH Diagnostics यांनी एकाच नावाचे दोन रुग्ण असल्या कारणाने नजरचुकीने दुसऱ्या रुग्णाचा रिपोर्ट त्यांच्या लॅब मधून रुग्णाच्या मुलाकडे हस्तांतरीत झाला आहे. परंतु रुग्णाच्या मुलाकडे त्यांनी Whats app वर योग्य अहवाल पाठविला असल्याचे कळविले आहे.

सदर हलगर्जीपणाबद्दल त्यांना समज देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

## बोरी फाटा, वडखळ (ता.पेण, जि.रायगड) येथील शासकीय गोदामात धान्याची नासाडी झाल्याबाबत

**(२४) ८४९० (१५-०६-२०२१) श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडखळ (ता.पेण, जि.रायगड) येथील ग्रामपंचायत हद्दीतील बोरी फाटा येथे असलेल्या शासकीय धान्याच्या गोदामातील हजारो टन धान्याच्या पोती उंदीर, घुशींनी फोडल्याचे माहे मे, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गोदामाच्या बाहेर ठेवलेल्या पोती अस्ताव्यस्त पडलेल्या असल्याबाबत स्थानिक गावकऱ्यांनी संबंधित विभागाकडे तक्रारी करुनही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, गोदामापासून जवळच तलाठी कार्यालय आणि मंडल अधिकारी यांचे कार्यालय असूनही त्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याने सदरहू नासाडी झालेल्या धान्याची भरपाई अधिकाऱ्यांकडून करण्यात यावी, अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धान्याची नासाडी करण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१५-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

याबाबत कोणत्याही ग्रामस्थांची लेखी तक्रार जिल्हा पणन अधिकारी, रायगड अलिबाग किंवा जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड अलिबाग यांचेकडे प्राप्त झालेली नाही.

तथापि, स्थानिक ग्रामस्थांनी दुरध्वनीवरुन दिलेल्या माहितीनुसार चौकशी केली असता, मौजे बोरी फाटा वडखळ, ता.पेण, जि.रायगड या गोदामात पेण तालुका खरेदी विक्री संघ यांनी शेतकऱ्यांकडून खरेदी केलेले धान उचलण्यात आल्यामुळे धानाची नासाडी झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात टाळेबंदीत नुकसान झालेल्या सर्व घटकांसाठी सर्वसमावेशक पॅकेज जाहीर करण्याबाबत

**(२५) ८५०२ (१०-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात टाळेबंदीच्या काळात नुकसान झालेल्या शेतकरी, शेतमजुर, विणकर, रिक्षा/टॅक्सी चालक, डबेवाले, कारखानदार, बांधकाम मजुर, न्हावी, धोबी, हमाल, पेन्शनर्स, विधवा, परित्यक्ता, अपंग, गटई कामगार, बचत गट, बारा बलुतेदार यांच्यासाठी आर्थिक व अन्य मदतीचे ५ हजार ४७६ कोटी रुपयांचे पॅकेज दिनांक १३ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले असून त्यात साळी, माळी, न्हावी, लोहार, सुतार, रसवंती चालक, पोल्ट्री चालक, गटई कामगार आणि सूक्ष्म उद्योजक या वर्गाचा समावेश केलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ७ लाख १५ हजार परवानाधारक रिक्षा चालकांना प्रत्येकी दीड हजार रूपये याप्रमाणे एकूण १०७ कोटी रूपये अनुदान देण्याचा निर्णय शासनाने दिनांक १९ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास घेतला असून अनुदानासाठी आजमितीस तब्बल ८१ हजारांहून अधिक रिक्षा चालकांनी अर्ज सादर केलेला असतानाही राज्यातील एकाही रिक्षा चालकाला सानुग्रह अनुदान शासनाकडून अदा करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई-ठाणे जिल्हयात सुमारे तीन लाखांहून अधिक परमिटधारक रिक्षाचालक असून शासनाकडून आर्थिक मदत न मिळाल्यामुळे त्यांच्यात असंतोष निर्माण झाला असून, अद्यापपर्यंत रिक्षा चालकांना सानुग्रह अनुदान न मिळण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बारा बलुतेदार आणि पारंपारिक व्यवसायिक व इतरांना मोफत अन्न धान्य, निवृत्तिवेतन योजना व अन्य कोरोना पॅकेजचा लाभ विना विलंब मिळावा यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (१५-११-२०२१) :** (१) कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे लावण्यात आलेल्या निर्बधामुळे प्रभावित झालेल्या घटकापैकी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत परित्यक्ता विधवा महिला, उद्योग ऊर्जा व कामगार विभागामार्फत बांधकाम कामगार व घरेलू कामगार, नगरविकास विभागामार्फत अधिकृत फेरीवाले व पथविक्रेत्यांना, आदिवासी विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या कुटूंबियांना, घटस्फोटीत महिला विधवा भूमीहिन शेतमजुर, अपंग व्यक्ती असलेले कुटुंब, अनाथ मुलांचे संगोपन करणारे कुटुंब, वनहक्क धारक कुटूंबे, अन्न व नागरी पुरवठा विभागातील अंत्योदय योजनेच्या प्राधान्य कुटूंबातील लाभार्थ्यांना १ महिन्याकरीता मोफत अन्नधान्य अशा विविध घटकांना शासनाकडून अर्थसहाय्य सध्या देण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.

राज्यातील रिक्षा परवाना धारकांना गृह (परिवहन) विभागाकडून निर्गमित दिनांक ७/५/२०२१ च्या शासन निर्णयान्वये एकावेळचे रुपये १५००/- असे सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे. ज्या परवानधारक रिक्षा चालकांनी सदर अनुदान मिळणेकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल केले होते, त्यांच्या बॅक खात्यामध्ये रक्कम जमा करण्यात आली आहे. ज्यांनी अद्याप ऑनलाईन अर्ज सादर केले नाही, त्यांना अर्ज दाखल करण्यासाठी प्रसार माध्यमातून आवाहन करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

रिक्षा परवानाधारकांना अनुदान देण्याकरीता ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली असून ऑनलाईन अर्ज करणाऱ्या परवानाधारकांचे अर्जाची तात्काळ छाननी करुन छाननीअंती पात्र लाभधारकांना त्यांचे आधार लिंक बँक खात्यावर अनुदान वर्ग करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कोरोना रुग्णांना आवश्यक उपचार मिळण्याबाबत

**(२६) ८५०३ (१७-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूची मोठ्या प्रमाणात लागण झाली असून माहे मार्च, २०२१ पर्यंत कोरोना बाधितांची संख्या ३० लाखाहून जास्त व लाखाच्या जवळपास मृत्यू झाले असून महानगरपालिका रुग्णालय तसेच शासकीय रुग्णालयामध्ये दाखल असलेल्या अनेक गंभीर रुग्णांना “व्हेंटिलेटर” च्या तुटवड्यामुळे प्रतिक्षा करावी लागत असून उपचार मिळण्यासाठी त्रास सहन करावा लागत असल्याची बाब दिनांक १५ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी आवश्यक ती साधन सामुग्री, लस, रेमडेसिवीर इंजेक्शन व व्हेंटिलेटर उपलब्ध न झाल्याने गंभीर आजार असलेल्या रुग्णांचे तसेच कोरोना रुग्णांचे जीव धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात कोरोना रुग्णांना आवश्यक ते उपचार मिळण्याबाबत तसेच अनेक गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना व्हेंटिलेटर, लस, रेमडेसिवीर इंजेक्शन व आवश्यक ती साधन सामुग्री पुरवठा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मार्च, २०२१ अखेर कोरोना आजाराचे २८,१२,९८० रुग्ण आढळले असून ५४६४९ एवढया जणांचा या आजारामुळे मृत्यू झाला आहे.

राज्यात पुरेशा प्रमाणात रुग्णांकरीता ऑक्सीजन बेड्स व व्हेंटीलेटरची सुविधा व औषध पुरवठा करण्यासाठी क्षेत्रिय यंत्रणेकडुन यथोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने रुग्ण वाढीचा दर लक्षात घेऊन पुढील पंधरवाड्यातील अपेक्षित रुग्णांचे अनुमान जिल्हा निहाय नियमितपणे काढले जाते.

त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यांमध्ये रुग्ण सुविधा निर्माण केल्या जातात त्यानुसार ऑक्सीजन, व्हेंटीलेटर बेड वाढविण्यात आले.

- रुग्णांना बेड मिळणे सुलभ व्हावे यासाठी प्रत्येक जिल्हा/ मनपास्तरावर केंद्रीय बेड व्यवस्थापन डॅशबोर्ड निर्माण करण्यात आले.
- रेमडेसीव्हीर इंजेक्शन वाटप सुरळीतपणे व्हावे यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमण्यात आली. अन्न व औषध प्रशासनाच्या समन्वयाने हा पुरवठा सुरळीत करण्यात येत आहे.
- मास्क, रेमडेसीव्हीर, प्रयोगशाळा चाचण्या यांच्या किंमतीवर योग्य नियंत्रण ठेवून त्या जनतेला योग्य किंमतीत मिळतील यासाठी उचित कार्यवाही करण्यात आली आहे.
- प्रत्येक जिल्ह्यामध्ये ऑक्सीजन व्यवस्थापन आणि ऑक्सीजन ऑडीट यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर विभागीय सहसंचालक यांच्या गैरकारभाराची चौकशी करण्याबाबत

**(२७) ८८०७ (१५-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे दिनांक ५ फेब्रुवारी, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या “मंत्रालय आपल्या दारी” ह्या उपक्रमादरम्यान शिक्षण जनप्रतिनिधींच्या उपस्थितीत डॉ.महेशकुमार साळुंखे, विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग यांच्या भ्रष्टाचाराच्या प्रकारणांसंदर्भात आलेल्या तक्रारीनुसार तात्काळ चौकशी करण्याचे आदेश मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी डॉ.माने, उच्च शिक्षण संचालक यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.साळुंखे यांच्या भ्रष्ट कारभाराची तात्काळ चौकशी करण्याची मागणी नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक १९/०३/२०२१ व दिनांक १४/०४/२०२१ रोजी निवेदन पाठवून केली तसेच मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी आदेश देवूनही डॉ.साळुंखे, विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग यांची अद्यापपर्यंत चौकशी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार उक्त प्रकरणी तात्काळ चौकशी समिती नियुक्त करुन डॉ.साळुंखे यांना निलंबित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२८-१०-२०२१) :** (१), (२), (३) नागपूर येथे दिनांक ०५/०२/२०२१ रोजी आयोजित “मंत्रालय आपल्या दारी” या उपक्रमादरम्यान तत्कालीन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर यांच्याविरूध्द प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने त्यांच्या कार्यभारासंदर्भात प्राथमिक चौकशी करण्यासाठी एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे.

डॉ.महेशकुमार साळुंखे यांच्याकडील विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर या पदाचा कार्यभार अन्य अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर येथील शिक्षण उपसंचालक कार्यालयातील अधिकारी/लिपिक यांच्याविरूध्द कारवाई करणेबाबत

**(२८) ८८०८ (२०-०७-२०२१) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर येथील अधिकारी/लिपिक यांच्या बेजबाबदारपणामुळे कोल्हापूर विभागातील पाच जिल्ह्यांमधील उच्च माध्यमिक शाळांचे अनुदान मंजुरीसाठीचे प्रस्ताव शासनास वेळेत सादर न केल्याप्रकरणी चौकशी करून त्यांचेविरूध्द दंडात्मक कारवाई करणेबाबत नागपूर विभागाचे शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक ८ मे, २०२१ रोजी निवेदन पाठविले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत काय, तसेच चौकशीबाबतचा अहवाल काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१) :** (१) सदर निवेदन दिनांक ०८/०५/२०२१ अन्वये पाठविले असून शासनास दिनांक ०५/१०/२०२१ रोजी प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

(२) विहित कालमर्यादेत शाळांचे अनुदान मंजूरीसाठीचे प्रस्ताव शासनास सादर न केल्यामुळे शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांच्या स्तरावरुन विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांना दिनांक १६/०२/२०२१ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच सदर विभागाचा अनुदान मंजूरी प्रस्ताव उशिरा प्राप्त झाल्यामुळे सदर विभागास उपलब्ध

होणारा प्रत्यक्ष निधी दिनांक १७/०३/२०२१ ऐवजी दिनांक १८/०८/२०२१ रोजी प्राप्त झाला असला तरी सर्व विभागातील शाळांना देय ठरणारे अनुदान हे दिनांक ०१/११/२०२० पासूनच देय ठरले असल्याने संबंधित शाळांचे अनुदान प्राप्तीचे नुकसान झालेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांना कोरोना संसर्गापासून रोखण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२९) ८८२२ (१४-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना महामारीच्या कालावधीत राज्य पोलीस दलातील ४२ हजार १०६ पोलीस बाधित होऊन ४३२ जणांचा मृत्यू झाल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांना कोरोना संसर्गापासून रोखण्यासाठी आवश्यकती सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच कोरोनाने मृत्यू पावलेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०१-१२-२०२१) :** (१) दिनांक २५/१०/२०२१ रोजी पर्यंत महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील ४९६ पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचा “COVID-१९” या सांसर्गिक रोगामुळे मृत्यू झाला आहे.

(२) १. सर्व पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना फेस मास्क, सॅनिटायजर, फेस शिल्ड इत्यादीचे नियमितपणे वाटप करण्यात येते.

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.४/व्यय-९, दिनांक २९/०५/२०२०, दिनांक १४/१०/२०२० व दिनांक १४/०५/२०२१ अन्वये कर्तव्यावर असताना “COVID-१९” या सांसर्गिक रोगाची लागण झाल्यामुळे

मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना रुपये ५०,००,०००/- इतके सानुग्रह सहाय्य, विवक्षित अटींच्या अधीन राहून प्रदान करण्यात येते.

३. या व्यतिरिक्त पोलीस रुग्णालय, नागपाडा, मुंबई येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने लसीकरण केंद्र सुरु करण्यात आले असून त्यामध्ये मुंबई शहरातील पोलीस अधिकारी/ कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबियांचे प्राधान्याने लसीकरण करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कोविड नियंत्रण मोहिमेत जिल्हा परिषदेंतर्गत कार्य करणाऱ्या शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर व आरोग्य कर्मचारी यांच्या कुटुंबियांना ५० लक्ष रूपयाचे विमा कवच लागू करण्याबाबत

**(३०) ८८२९ (१०-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड नियंत्रण मोहिमेत जिल्हा परिषदेंतर्गत कार्य करणाऱ्या शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर व आरोग्य कर्मचारी हे कोविड सर्व्हेक्षणाचे काम करत असताना यातील अनेक कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला असून सदर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना विमा कवच लागू केला नसल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कोविड सर्व्हे करतांना त्यांच्या सुरक्षेकरीता मास्क, सॅनिटायझर व हॅन्ड ग्लोव्हज यासारख्या सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कोविड सर्व्हेक्षणात काम करणाऱ्या कोविड योध्दांना शासन ५० लक्ष रूपयाचे विमा कवच लागू करण्याची मागणी विविध संघटनेकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात कोविड नियंत्रण मोहिमेत जिल्हा परिषदेंतर्गत कार्य करणाऱ्या शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर व आरोग्य कर्मचारी यांच्या कुटुंबियांना ५० लक्ष रूपयाचे विमा कवच लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-११-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

कोविड संबंधी विमा योजना सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना लागू असून त्यात आशा वर्कर यांचा समावेश आहे. तथापि, यामध्ये कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांचा समावेश नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रधानमंत्री गरीब कल्याण विमा पॅकेज अंतर्गत आशा वर्कर यांना रुपये ५०.०० लक्ष रुपयांची विमा योजना लागू करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोनाची तिसरी लाट १८ वर्षाखालील वयोगटासाठी धोकादायक असल्याबाबत

**(३१) ८८३३ (१०-०६-२०२१) श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अरुण लाड, श्री.नरेंद्र दराडे, श्री.सुरेश धस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाची तिसरी लाट १८ वर्षाखालील वयोगटासाठी धोकादायक असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनी अंदाज व्यक्त केल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून राज्यातील चार कोटींवर बालक-पालक चिंतातूर झाले असून त्यापार्श्वभुमिवर आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्यादृष्टीने राज्यभरातील कृतीदलातील बालरोग तज्ज व डॉक्टर यांच्याबरोबर मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान बैठक घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत कोरोनाबाधित बालकांवरील उपचारासाठी कोणती सुरक्षात्मक उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला असून उपचार कसे करावेत या बाबतचा निर्णय झाला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, लहान मुलांना कोरोना संसर्गापासून रोखण्यासाठी आवश्यक ती आरोग्यविषयक उपाययोजना करण्याच्यादृष्टीने विशेष टास्क फोर्सची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-११-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

देशभरात वर्षभरात कोविड-१९ आजाराची तिसरी लाट येवू शकते, असा अंदाज गणितीय प्रारुपाचा आधारे तज्ञांनी मांडला आहे. या लाटेमध्ये लहान मुलांना सर्वाधिक बाधा होऊ शकते, असा एक तर्क असला तरी त्याला वैज्ञानिक आधार नाही, तथापि, हा अंदाजही गांभीर्याने घेऊन राज्यस्तरावर बालरोग तज्ञांचा वेगळा टास्कफोर्स स्थापन करण्यात आलेला आहे. तसेच मा.मुख्यमंत्र्यांनी त्यांच्यासोबत बैठकही घेतली आहे. बालकांच्या पालकांमध्ये भिती, चिंता काही प्रमाणात आहे. तथापि, त्यांचे विविध माध्यमांद्वारे प्रबोधन करण्यात येत आहे.

(२) बालरोग तज्ञांच्या राज्यस्तरीय कृती दलाने (टास्कफोर्स) ने तिसऱ्या लाटेसंदर्भात पुढीलप्रमाणे कृती योजना ठरविली आहे.

- मुलांमध्ये फ्ल्यू सदृश्य आजाराचे व सारी आजाराचे नियमित सर्वेक्षण
- कोविड रुग्णालयामध्ये १० टक्के खाटा मुलांसाठी राखीव ठेवणे.
- तालुका पातळीवरील रुग्णालयांमध्ये मुलांच्या उपचाराची सोय.
- डॉक्टर्स, आरोग्य कर्मचारी यांचे प्रशिक्षण.
- मुलांचे पालक, शिक्षक, आरोग्य कर्मचारी यांचे आरोग्य शिक्षण, मुलांमधील धोक्यांच्या लक्षणांबाबत जनजागृती.
- मुलांच्या नियमित लसीकरणावर भर, चुकलेले डोस पूर्ण करण्याचे आवाहन.

(३) शासनाने राज्यस्तरावर बालरोग तज्ञांचा विशेष टास्कफोर्स स्थापन केला आहे. तसेच या टास्कफोर्सच्या मदतीने राज्यातील सर्व बालरोग तज्ञांना ऑनलाईन मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सहकार विभाग (जि.नाशिक) येथील वरिष्ठ अधिकारी यांच्या बदल्याबाबत

**(३२) ८८४९ (१३-०७-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तीन वर्षाचा नियोजित कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर अधिकारी/कर्मचारी यांची राज्यातील इतर जिल्हयात बदली होणे अपेक्षित असताना नाशिक जिल्हयात सहकार विभागातील काही वरिष्ठ अधिकारी यांच्या बदल्या अद्याप झाल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकार विभागातील अशा किती अधिकाऱ्यांच्या इतर जिल्हयात बदल्या झाल्या नाहीत तसेच किती कालावधीसाठी त्यांच्या बदल्या करण्यात आल्या नाहीत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नाशिक जिल्हयातील सहकार विभागात काम करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या इतरत्र बदल्या करुन त्यांना नवीन ठिकाणी काम करण्याच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१६-११-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही. नाशिक जिल्हयात सहकार विभागातील गट-अ संवर्गातील कोणतेही अधिकारी सन २०२१ मध्ये बदलीपात्र नव्हते, तर गट-ब संवर्गातील सहायक निबंधक, सहकारी संस्था या संवर्गातील ४ बदलीपात्र अधिकाऱ्यांपैकी ३ अधिकाऱ्यांची बदली, बदली अधिनियमातील तरतुदीनुसार नाशिक जिल्हयाबाहेर करण्यात आली आहे, तर एका अधिकाऱ्याची जिल्हयांतर्गत बदली करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक शहरातील खाजगी रुग्णालयांनी तपासणी करण्यास नकार दिल्याने सफाई कामगाराचा मृत्यू झाल्याबाबत

**(३३) ८८५७ (१५-०७-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील सिडको लेखानगर परिसरातील तीन खाजगी रुग्णालयांनी मनपा सफाई कामगार नंदू सोनवणे यांच्यावर उपचार करण्यास नकार दिल्याने त्यांचा रिक्षातच मृत्यू झाल्याची घटना माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सफाई कामगाराचा कोरोना अहवाल निगेटीव्ह आला असून ही खाजगी रुग्णालयाने त्यांना दाखल करुन न घेतल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरोग्य विभागाने कोरोना महामारीच्या काळात कुठल्याही बाधित अथवा बाधित नसलेल्या रुग्णांना प्रतिक्षा न करता त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करुन घेतले पाहिजे असे राष्ट्रीय धोरण जाहीर केले असतानाही या खाजगी रुग्णालयाने त्याचे उल्लंघन केल्याने सदर रुग्णालयावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर विभागातील सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) कार्यालयाची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत

**(३४) ८९०० (२०-०७-२०२१) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया येथील शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) कार्यालयाने सन २०१३-२०१४ पासून बोगस दस्तावेजाच्या आधारे दिलेल्या नियुक्त्यांना मान्यता दिल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने तसेच सदरहू व्यवहारात करोडो रूपयांचा भ्रष्टाचार करण्यात आल्याने उक्त सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक ०१/१०/२०२० रोजी व त्यापुर्वी अनेकवेळा निवेदने देवून केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू तक्रार/निवेदनाच्या आधारे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१) :** (१) सदर निवेदन आयुक्त (शिक्षण) यांना दिले आहे, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी गोंदीया जिल्हयातील विविध ४ शाळांमधील एकूण ५ शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्यात आल्या असून उर्वरित २९ शाळांमधील ४६ कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता प्रकरणी आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

---

## वाळुज (जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३५) ८९२६ (१०-०६-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळुज (जि.औरंगाबाद) येथे सन २०१८ मध्ये गट नं. ३६१ मधील ३ एकर जागेत रुपये ५ कोटी ५० लाख खर्च करुन सुसज्ज आरोग्य केंद्राच्या इमारतीची उभारणी केली असून सदर आरोग्य केंद्रामध्ये कोणत्याही सोयी सुविधा उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसुती, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया व शवविच्छेदन या सर्व प्रकारच्या तपासण्याचे प्रयोजन असतानाही तेथे फक्त बाहयरुग्ण तपासणी केली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात अपुरा कर्मचारी वर्ग व औषधीचा तुटवडा असल्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना आवश्यक त्या सोयी सुविधा मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरुन ग्रामीण भागातील रुग्णांना आवश्यक त्या सोयी सुविधा देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०७-१२-२०२१) :** (१) प्राथमिक आरोग्य केंद्रात कोणत्याही सोयी सुविधा उपलब्ध नाहीत, हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

नविन इमारतीच्या ठिकाणी प्रसुती/कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यासाठी लागणारे टेबल व साधन सामग्री उपलब्ध झाली असून दिनांक २५/०१/२०२१ पासून बाहयरुग्ण सेवा, आंतररुग्ण सेवा, प्रस्तुती, शवविच्छेदनगृह सेवा सुरु करण्यात आल्या आहेत.
(३) व (४) हे खरे नाही.

नियमित कर्मचाऱ्यांची पदभरती करण्याबाबत शासन निर्णय ग्रामविकास विभाग दिनांक १४/०६/२०२१ निर्गमित झाला असून जिल्हा परिषदस्तरावरुन पदभरती करण्यात येणार आहे. तोपर्यंत वैद्यकीय अधिकारी १ पद भरले आहे व काही कर्मचारी प्रतिनियुक्तीवर घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्यात आले आहे.

माहे ऑगस्ट, २०२० पासून या प्राथमिक आरोग्य केंद्रात कोविड केअर सेंटर सुरु करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील नझूल येथील लिज पट्ट्याबाबत

**(३६) ८९४१ (१५-०७-२०२१) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील नझूल शिट नं. १५ भूखंड क्र. ४ मधील ३०३२१.९ चौ.मी. जमिनीचा लिज पट्ट्याची मुदत सन १९९५ मध्ये संपुष्टात आली असून सन १९९५ पासून सदर जमिनीवर हजारीमल जगन्नाथ ॲण्ड कंपनी भागीदार संस्था तर्फे भागीदार श्री.अनिल मनोहर बियाणी यांचा अनधिकृत ताबा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन जिल्हाधिकारी, अकोला यांनी दिनांक ४ मार्च, २००५ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार हजारीमल जगन्नाथ ॲण्ड कंपनी भागीदार संस्था तर्फे भागीदार श्री.अनिल मनोहर बियाणी यांनी सदर जमिनीचा मूळ प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय वापर करुन शर्तभंग केला आहे, तसेच सदर जमिनीच्या लिज पट्ट्याचा शर्त भंग केल्यामुळे श्री.अनिल मनोहर बियाणी यांना औद्योगिक प्रयोजनासाठी येणाऱ्या अकृषक आकारणीच्या दुप्पट रक्कम दंड आकारला तसेच पोस्टा ऑक्युपेंसी चार्जेस आकारले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हजारीमल जगन्नाथ ॲण्ड कंपनी भागीदार संस्था तर्फे भागीदार श्री.अनिल मनोहर बियाणी यांनी दिनांक १९ नोव्हेंबर, १९९३ व दिनांक २५ जून, १९९४ रोजी सदर जमीन ३० वर्षांचे भाडेपट्ट्याने किंवा मालकी हक्काने देणेबाबत कळविल्यानुसार नगररचना विभागाने निर्धारित केलेले मुल्याचा भरणा करण्यास सांगितले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, न्युण ईस्टा इंडिया कंपनी मुंबई व हजारीमल जगन्नाथ ॲण्ड कंपनी भागीदार संस्था तर्फे भागीदार श्री.अनिल मनोहर बियाणी यांचेमध्ये दिनांक ६ ऑक्टोबर, १९५७ रोजी करण्यात आलेल्या नोंदणीकृत खरेदी खताची प्रत, मूळ लिज पट्टा शासनाकडे उपलब्ध आहे काय,

(५) असल्यास, हजारीमल जगन्नाथ ॲण्ड कंपनी भागीदार संस्था तर्फे भागीदार श्री.अनिल मनोहर बियाणी यांनी शर्तभंग केल्याप्रकरणी औद्योगिक प्रयोजनासाठी येणाऱ्या अकृषक आकारणीच्या दुप्पट रक्कम दंड, पोस्ट ऑक्युपेंसी चार्जेस तसेच नगररचना विभागाने निर्धारित केलेले मुल्य यापैकी कोणतीही रक्कम न भरता शासनाचे करोडो रुपये बळकावण्याचा प्रयत्न केला असल्याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०१-१२-२०२१) :** (१), (२) व (३) होय.

(४) उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार दिनांक ०६/१०/१९५७ चे नोंदणीकृत खरेदीखताची प्रत व मूळ लिजपट्टा दिसून येत नाही, परंतु ह.नो.र/ अधिकार अभिलेख व प्रकरणात दाखल सन १९३० चे सेटलमेंटचे प्रकरणा नुसार सदर भूखंड सन १९०५ पासून न्यु ईस्ट इंडिया कंपनीला ९० वर्षाचे लिजवर दिल्याचे दिसून येते.

(५) तत्कालीन जिल्हाधिकारी अकोला यांचे दिनांक ०४/०३/२००५ चे आदेशानुसार सदर भाडेपट्टा रद्द करण्यात आला असून भूखंड शासन जमा करण्याचे आदेश आहेत, परंतु सदरचे आदेशा विरुध्द श्री बियाणी यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपील प्रकरणात मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांच्या दिनांक ०४/०९/२०१७ रोजीच्या आदेशान्वये स्थगनादेश (Status-quo) दिलेला आहे.

(६) आज रोजी सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असून मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांच्या दिनांक ०४/०९/२०१७ रोजीच्या आदेशान्वये स्थगनादेश (Status-quo) दिलेला असल्याने सदर प्रकरणात पुढील कार्यवाही करता आलेली नाही.

___________

# कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सत्यम रुग्णालयात रुग्णांची आर्थिक लूट होत असल्याबाबत

**(३७) ८९४६ (१५-०७-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील एलआयजी कॉलनीत राहणारे श्री.मावळे यांना कोरोनाची लागण झाल्याने त्यांना त्याच परिसरातील सत्यम रुग्णालयात माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान उपचारार्थ दाखल करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णाचे उपचारादरम्यान निधन झाले असून रुग्णालय व्यवस्थापनाने रुग्णाच्या उपचाराचे रुपये दोन लाख जमा केल्याशिवाय मृतदेह कुटुंबियांच्या ताब्यात देणार नसल्याची भूमिका घेतली असून रुग्णालय व्यवस्थापनेकडून रुग्णांच्या कुटुंबियाची आर्थिक लूट होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशाप्रकारे रुग्णांच्या कुटुंबियांची आर्थिक लूट करणाऱ्या रुग्णालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२३-११-२०२१) :** (१), (२) व (३) श्री नवनाळा किसन मावळे या करोनाग्रस्त रुग्णाला दिनांक १८/०४/२०२१ रोजी सत्यम हॉस्पिटल, कळंबोली येथे दाखल करण्यात आले होते.

सदर रुग्णाची प्रकृती खालावल्याने दिनांक २६/०४/२०२१ रोजी मृत्यू झाला व त्याच दिवशी रात्री महानगरपालिकेच्या रुग्णवाहिकेने श्री.मावळे यांचा मृतदेह पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात आला. अत्यंविधी नोंद रजिस्टरमध्ये त्यांचे क्रमांकासमोर रात्री १० वाजताची नोंद आहे.

श्री.मावळे यांच्या उपचारार्थ बिल जास्तीचे असल्याचे अथवा बिलांचा भरणा केल्याशिवाय मृतदेह ताब्यात देत नसल्याबाबत रुग्णांच्या नातेवाईकांनी तक्रार केलेली नाही. तथापि, पनवेल महानगरपालिका हद्दीतील कोविड-१९ रुग्णालयांचे लेखा व अनुषंगिक बाबींचे लेखापरिक्षण

उपजिल्हाधीकारी यांच्या नियंत्रणाखाली स्थापन करण्यात आलेल्या लेखापरिक्षण पथकाने दिनांक १६/०६/२०२१ रोजी लेखापरिक्षण करुन प्रत्यक्ष बिलात रुपये ४७,५००/- एवढी जादा आकारणी केल्याचे नमूद केले आहे. तथापि, रुग्णांच्या नातेवाईकांनी औषधांसह रुपये ३००००/- एवढीच रक्कम रुग्णालयास अदा केली असल्याने बिलाच्या रकमेसाठी मृतदेह ताब्यात देणार नाही अशी अडवणूक रुग्णालयाने केलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर व भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात रुग्णसेवा करणाऱ्या वाहनचालकांना मोबदला मिळण्याबाबत

**(३८) ८९४९ (२२-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना महामारी रोखण्यासाठी व रुग्णांवर वेळीच उपचार व्हावे यासाठी शहापूर व भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात प्रत्येकी आठ प्रमाणे खाजगी १६ वाहने जिल्हा आरोग्य प्रशासनाकडून दिनांक २२ जुलै, २०२० रोजीपासून भाड्याने लावण्यात आली असून त्यांना गेल्या आठ महिन्यांचा मोबदला देण्यात आला नसल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाहन चालकांना त्यांचा योग्य तो मोबदला तात्काळ न दिल्यास बायकामुलांसह उपोषणास बसण्याचा इशारा त्यांनी जिल्हा आरोग्य प्रशासन, ठाणे व शहापूर व भिवंडी तालुका आरोग्य प्रशासनास तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांना लेखी स्वरुपात दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णसेवा करणाऱ्या वाहनचालकांना मोबदला देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व वाहनचालकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाहनचालकांना मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२३-११-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील दिनांक १३/०७/२०२० च्या आदेशान्वये ठाणे जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील शहापूर तालुक्यासाठी ०८ व भिवंडी तालुक्यासाठी ०८ वाहने भाड्याने घेण्यात आली होती. सदर वाहनांचे भाडे राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) मधून अदा करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेशात नमूद केले होत.

राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) यांचेकडून सप्टेंबर, २०२० पासून निधी उपलब्ध न झाल्याने सदर देयके प्रलंबित होती. तथापि, जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून दिनांक २५ जुन, २०२१ रोजी रुपये १.५० कोटी एवढया निधीचा धनादेश, जिल्हा परिषद ठाणे यांचेकडे प्राप्त झाला असून संबंधितांची देयके तातडीने अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई क्षेत्रिय कार्यालयातील कार्यरत तांत्रिक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत

**(३९) ९००७ (२०-०७-२०२१) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई क्षेत्रिय कार्यालयाच्या आस्थापने वर २० ते २५ वर्षापासून कार्यरत असलेल्या तांत्रिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सहाय्यक भांडारपाल पदावरून भांडारपाल पदावर आणि भांडारपाल पदावरून भांडार अधीक्षक पदावर पदोन्नती देण्याबाबत शासन निर्णय पारित झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६ विभागांपैकी औरंगाबाद विभागात सन २०१६, २०१७, २०१८ व २०१९ यावर्षी भांडारपालाच्या रिक्त पदावर सहाय्यक भांडारपालांना पदोन्नती दिल्या तसेच उर्वरित ५ विभागात मागील १७ वर्षांपासून भांडारपाल पदे वगळून वर्ग ३ च्या सर्व कार्यरत पदाचे पदोन्नती आदेश निर्गमित होतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भांडार संवर्गीय पदावरील कर्मचाऱ्यांना वर्ग ३ च्या पदोन्नतीपासून वंचित ठेवले जात असून वित्त विभागाचे शासन निर्णय एक ते दीड वर्षापूर्वी निर्गमित होवूनही ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळणेपासून राज्यातील औरंगाबाद वगळता ५ क्षेत्रिय संचालक यांनी अडवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तांत्रिक संवर्गीय सहायक भांडारपाल व भांडारपाल यांना पदोन्नती देणे तसेच ७ वा वेतन आयोगाप्रमाणे सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळणेपासून वंचित ठेवणाऱ्या सहायक क्षेत्रिय संचालक यांच्याविरूध्द कारवाई करुन तांत्रिक संवर्गीय सहायक भांडारपाल व भांडारपाल यांना सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (१०-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही. या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोट (जि.अकोला) येथील ग्रामीण पोलीस स्टेशन व पोलीस निवासस्थानाचे नवीन इमारती बांधण्याबाबत

**(४०) ९०१० (१४-०६-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) येथील ग्रामीण पोलीस स्टेशन कार्यालयाचे कामकाज शासकीय अधिकाऱ्याचे निवासस्थान असलेल्या खोलीतून चालविले जात असल्याचे तसेच तेथे कार्यरत असणाऱ्या पोलिसांची निवासस्थाने देखील ब्रिटीशकालिन अत्यंत जीर्ण व धोकादायक स्थितीत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामीण पोलीस कार्यालयाशी अकोट तालुक्यातील ९० गावे कार्यक्षेत्रात येत असल्यामुळे पोलीस स्टेशन कार्यालय तसेच पोलीस निवासस्थाने यासाठी शहरात स्वतंत्र जागा व निवासस्थान इमारतीचे नवीन बांधकाम करण्यात यावे असा प्रस्ताव अनेक वर्षापासून वरिष्ठ पातळीवर प्रलंबित असल्याचे दिनांक ५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण पोलीस कार्यालयाची प्रस्तावित नवीन इमारत बांधकाम होईपर्यंत अकोट येथीलच ग्रामीण रुग्णालयाची जागा पोलीस स्टेशनकरीता उपलब्ध करुन देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अकोट येथे नवीन पोलीस ठाणे इमारत व पोलीस निवासस्थानाची नवीन इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०१-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

अकोट (ग्रामीण) पोलीस ठाणे सन २०१४ पासून कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

I. पोलीस ठाणे अकोट (ग्रामीण) करीता ग्रामीण परिसरातील ग्राम बोर्डी रोडवरील गट क्र.४८ मधील एक हेक्टर ४८ आर.ई क्लास जागा पोलीस विभागास उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हाधिकारी, अकोला, तसेच उप विभागीय अधिकारी, अकोट यांच्याकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे सदर प्रक्रिया कार्यवाहीधीन आहे.

II. अकोट येथील उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अकोट यांच्याकरीता प्रशासकीय इमारत बांधकाम करणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास प्राप्त झाला आहे.

III. प्राधान्यक्रम व निधीची उपलब्धतेनुसार महाराष्ट्र राज्य गृह निर्माण व कल्याण महामंडळामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) होय.

(४) अकोट (ग्रामीण) पोलीस ठाणे इमारत व निवासस्थाने यांच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रामटेक (जि.नागपूर) उपजिल्हा रुग्णालयात व्हेंटिलेटर वापराविना पडून असल्याबाबत

**(४१) ९०५२ (१८-०६-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) उपजिल्हा रुग्णालयात पाच व्हेंटिलेटर मशीन विना वापर असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीएम केअर फंडातून संबंधित रुग्णालयात मागील टाळेबंदीत पाच व्हेंटिलेटर मशीन देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संपूर्ण तालुक्यात कोरोनाने गंभीर रुप धारण केले असून एकीकडे कोरोना रुग्णांना व्हेंटिलेटरअभावी जीव गमवावा लागत असताना रामटेक उपजिल्हा रुग्णालयात पाच व्हेंटिलेटर विना वापर असण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रामटेक उपजिल्हा रुग्णालयात असलेले पाच व्हेंटिलेटर कार्यान्वित न करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) उपजिल्हा रुग्णालय, रामटेक येथील पीएम फंडातून प्राप्त झालेले पाच व्हेंटीलेटर हे इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर रुग्णसंख्या वाढल्याने येथे तात्पुरत्या तत्वावर वापरण्यासाठी हस्तांतरीत केले आहे. रामटेक तालुक्यातील कोविड-१९ च्या रुग्णांवर डीसीएच/ डीसीएचसी स्तरावर रुग्णसेवेसाठी आवश्यक सुविधा नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे प्राप्त करुन घेतल्या आहेत.

(४) व (५) उपजिल्हा रुग्णालय, रामटेक येथे सदरील व्हेंटीलेटर वापरासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ व इतर संबंधित सुविधांचे काम अंतिम टप्प्यात असून, सदर काम पूर्ण होताच व्हेंटीलेटर पुन:श्च पुनर्स्थापित करण्यात येतील.

---

## दिव्यांगांना दिल्या जाणाऱ्या तीनचाकी सायकल (ट्रायसिकल) नागपूर जिल्ह्यात विनावापर असल्याबाबत

**(४२) ९०७० (१३-०७-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत दिव्यांगांना दिल्या जाणाऱ्या तीनचाकी सायकल (ट्रायसिकल) व साहित्याचे वाटप न झाल्यामुळे सदर साहित्य नागपूर पंचायत समितीत विनावापर पडून असल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांग कल्याण योजना राबविण्यास समाजकल्याण विभाग अनास्था दाखवत असल्याबद्दल स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने दिव्यांग व्यक्तींना तीनचाकी सायकल व इतर सोयी सुविधा मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१५-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील आरोग्यवर्धिनी केंद्र व उपकेंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४३) ९०७६ (१७-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील आरोग्यवर्धिनी केंद्र चान्ना बाकटी येथील वैद्‌यकीय अधिकारी/कर्मचारी यांची पदे रिक्त असल्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला असून आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी कोरोना बाधित होत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे कोरोना प्रतिबंधक लसीकरण व तपासणी कार्यात अडथळे येत असून उपलब्ध मुनष्यबळावर निर्धारित कार्य पूर्ण होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोना संसर्गाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने आरोग्यवर्धिनी केंद्र व उपकेंद्रातील रिक्त पदे भरण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आरोग्यवर्धिनी केंद्र व उपकेंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रातील २ वैद्यकीय अधिकारी सन २०२० मध्ये कोरोना बाधित झाले होते. प्राथमिक आरोग्य केंद्र चान्ना बाकटी येथे प्रयोगशाळा तंत्रज्ञ, वाहनचालक, परिचर यांचे प्रत्येकी १ पद अशी ३ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

उपलब्ध कर्मचाऱ्यांमार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रातील लसीकरण व आरोग्य सेवेची कामे सुरळीत सुरु आहेत.

(३) व (४) आरोग्यवर्धिनी केंद्र व उपकेंद्रातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक १४/०६/२०२१ नुसार पदभरतीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयात शासकीय व खाजगी रूग्णालयात बेड, व्हेंटिलेटर, ऑक्सिजन व रेमडेसिवीर इंजेक्शनचा पुरवठा करण्याबाबत

**(४४) ९४०१ (१७-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात कोरोना प्रादुर्भावामुळे दररोज १५०० च्या जवळपास रूग्ण आढळत असून शासकीय व खाजगी रूग्णालयात बेड उपलब्ध होत नसून तसेच, व्हेंटिलेटर, ऑक्सिजन व रेमडेसिवीर इंजेक्शनचा पुरवठा होत नसल्याने रूग्णांचे मृत्यू होत असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यात शासकीय व खाजगी रूग्णालयात बेड उपलब्ध करणेबाबत तसेच व्हेंटिलेटर, ऑक्सिजन व रेमडेसिवीर इंजेक्शनचा पुरवठा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राप्त अहवालानुसार दिनांक २४/०४/२०२१ ते दिनांक २६/०४/२०२१ या कालावधीत जिल्ह्यात रुग्ण दाखल करुन घेण्यासाठी बेड अपुरे पडले होते. तथापि, व्हेंटीलेटर, ऑक्सीजन व रेमडेसिवीर इंजेक्शनचा पुरवठा होत नसल्याने रुग्णांचे मृत्यू होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे नाही.

(२) होय.

रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता, शासकीय व खाजगी रुग्णालये कोवीड रुग्णोपचारासाठी डीसीएच व डीसीएचसी म्हणून नामनिर्देशित करुन कार्यान्वित करण्यात आले त्यामुळे डीसीएच व डीसीएचसी व सीसीसी मध्ये पुरेसे बेड उपलब्ध करण्यात झाले. तसेच व्हेंटीलेटर, ऑक्सीजन व रेमडेसिवीर इंजेक्शनचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात आला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापकांच्या पदभरतीसाठी पी.एच.डी.ची अट शिथील करण्याबाबत

**(४५) ९४६६ (१९-०८-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप, डॉ.रणजित पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्रालय आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) अधिसूचनेनुसार दिनांक १ जुलै, २०२१ पासून विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक पदाकरीता नेट, सेट सोबतच पी.एच.डी. पात्रता लागू करण्यात आल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या विद्यापीठामध्ये सहाय्यक प्राध्यापकांची १५०० पदे रिक्त असून भरती प्रक्रिया बंद असल्याने राज्यात नेट-सेट सह पीएचडी पात्रताधारकांची असलेली अल्प संख्या लक्षात घेता केंद्रीय मानव संसाधन मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार अनेक नेट-सेट पात्रताधारक केवळ पीएचडी नसल्याने त्यांना विद्यापीठामधील पद भरतीपासून वंचित राहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने प्राचार्य पद भरती निर्णय घेवून नॅक मुल्यांकनासाठी आणि शैक्षणिक कामकाज पार पाडण्यासाठी प्राचार्य पद भरण्याचे आवश्यक असल्याचे नमूद करुन प्राचार्य पद भरतीसाठी अनेक निर्बंध रद्द केले, त्याच धर्तीवर या प्रकरणी सहाय्यक प्राध्यापक पदासाठी पीएचडी अट रद्द करण्यात यावी अशी मागणी सचिव, महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेमार्फत करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, युजीसीकडून वारंवार शासनाला सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्याची सूचना दिली जात असतानाही पद भरती वेळेत पूर्ण न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नेट सेट पात्रता कायम ठेवून पीएचडीची अट शिथील करुन तात्काळ सहाय्यक प्राध्यापकांची पद भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२९-१०-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १८ जुलै, २०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये दिनांक ०१ जुलै, २०२१ पासून पुढे विद्यापीठात सहायक प्राध्यापक म्हणून नियुक्त होण्यासाठी पीएच.डी. पदवी धारण केलेली असणे

ही शैक्षणिक अर्हता विहीत केलेली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सदर तरतूदी शासन निर्णय दिनांक ०८ मार्च, २०१९ अन्वये राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यांना लागू केलेल्या आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील अकृषी विद्यापीठांमध्ये सहायक प्राध्यापकांची ३१ मार्च, २०२१ अखेर एकूण १४२७ पदे मंजूर असून त्यापैकी ५३४ इतकी पदे रिक्त आहेत.

(३), (४) व (५) अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांच्या नियुक्तीच्या शैक्षणिक अर्हता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विहीत केल्या जातात. सदर अर्हता शिथील करणे उचित ठरणार नाही. तसेच अकृषी विद्यापीठांमधील रिक्त पदे भरण्याबाबत वित्त विभागाने पदभरतीवर आणलेल्या निर्बंधातून सूट मिळण्याबाबत वित्त विभागाशी विचारविनियम सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील रुपी बँकेतील प्रशासकीय व आर्थिक अनियमिततेमुळे आर.बी.आय. ने निर्बंध घातल्याबाबत

**(४६) ९७६६ (१७-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक ५३६७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुमारे ५५ हजार सभासद आणि सात लाख ठेवीदार असलेल्या तसेच १४०० कोटी रुपयांच्या ठेवी असलेल्या सुमारे १०५ वर्षाच्या पुणे येथील रुपी बँकेतील प्रशासकीय व आर्थिक अनियमिततेमुळे रिझर्व्ह बँकेने दिनांक

२१ फेब्रुवारी, २०१३ रोजीपासून आर्थिक निर्बंध घातले असल्यामुळे बँक अवसायानाच्या मार्गावर असून यासंदर्भात बँकेचे खातेदार व ठेवीदार यांनी सहकार विभागाकडे लेखी स्वरुपात विनंती केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुपी बँकेवर निर्बंध असतानाही बँकेने समाधानकारक कामगिरी केलेली असून चालू वर्षात जानेवारी, २०२१ च्या अखेरच्या सुमारापर्यंत बँकेने २५८.११ कोटी रुपयांची वसूली केली असून, सरासरी परिचलनात्मक नफा १९.९३ कोटी रुपये झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बँकेने जानेवारी, २०२१ अखेर ९२ हजार ६०२ ग्राहकांना ३६६.५४ कोटी रुपये आपत्कालीन योजनेत दिले असून गत पाच वर्षात परिचलनात्मक नफा झाला आहे, या बाबींच्या अनुषंगाने रुपी सहकारी बँकेचा परवाना रिझर्व्ह बँके ऑफ इंडियाने (आरबीआय) दिनांक ३१ मे, २०२१ पर्यंत वाढवला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बँकेचे खातेदार व ठेवीदार यांचे हित विचारात घेता व बँकेने गेल्या सुमारे पाच वर्षात केलेली चांगली कार्यवाही विचारात घेता बँकेचे खातेदार व ठेवीदार यांचे हित जपण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१२-११-२०२१) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.

बँकेने सन २०१६ ते सन २०२१ या कालावधीत रुपये २६३.९३ कोटी एवढ्या रक्कमेची वसुली केली असून, याच कालावधीत परिचलनात्मक नफा रुपये ७०.८२ कोटी झाला आहे.
(३) व (४) बँकेने माहे मार्च, २०२१ अखेरपर्यंत ९३,७३९ ठेवीदारांना हार्डशीप योजनेंतर्गत सुमारे रुपये ३७१ कोटी इतकी रक्कम अदा केली असून बँकेस मागील ५ वर्षात रुपये ७०.८२ कोटी एवढा परिचलनात्मक नफा झाला आहे. त्यानुषंगाने रिझर्व्ह बँकेने रुपी बँकेचा परवाना दिनांक ३०/११/२०२१ पर्यंत वाढविला आहे.

रुपी बँकेने आर्थिक निर्बंध लागू झाल्यापासून मार्च, २०२१ पर्यंत रुपये ३३३ कोटींची कर्जवसुली केली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी करुन बँकेच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार संबंधित संचालक/अधिकारी यांच्याविरुध्द एकून रुपये १४९० कोटींची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. सदर आदेशाविरुध्द ४८ अपील व ५ पुनरिक्षण अर्ज असे एकूण ५३ प्रकरणे शासनाकडे दाखल करण्यात आली आहेत. तत्कालीन मा.मंत्री (सहकार) यांनी सदर आदेशास स्थगिती दिली आहे. तद्नंतर तत्कालीन मा. मंत्री (सहकार) यांनी सदर प्रकरणे तत्कालीन अपर मुख्य सचिव (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचेकडे वर्ग केली असून सुनावणी अंतिम टप्प्यात आहे.

सहकार आयुक्त कार्यालयाने रुपी बँकेचे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत विलिनीकरणाबाबतचा प्रस्ताव दिनांक १६/०१/२०२० रोजी रिझर्व्ह बँकेकडे सादर केला होता. रिझर्व्ह बँकेच्या दिनांक २४/०८/२०२० रोजीच्या पत्रामधील निर्देशास अनुसरुन सहकार आयुक्त कार्यालयाने शिफारशीसह सुधारीत प्रस्ताव दिनांक ०२/०२/२०२१ रोजी नाबार्ड व रिझर्व्ह बँकेस सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथील आदिवासी विकास विभागातील प्रवेशद्‌वारासंदर्भात तत्कालीन TRTI आयुक्तांची चौकशी करण्याबाबत

**(४७) ९८३० (०९-०६-२०२१) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्मदाय आयुक्त कार्यालयामार्फत नोंदणीकृत असलेल्या आदिवासी सशक्तीकरण आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे मध्ये ७५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे तसेच दिनांक १ जानेवारी, २०१८ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीत राबविण्यात आलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षण प्रकल्पामध्ये ७० कोटींचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील भ्रष्टाचार प्रकरणी दिनांक ८ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास मुख्य सचिव यांना सविस्तर लेखी पत्र देऊनही अद्यापही या याबाबत काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी विभागातील सुमारे १५० कोटी रुपयाच्या भ्रष्टाचाराप्रकरणी तत्कालीन आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या (TRTI) आयुक्तांची सखोल चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई होऊन जमीन महसूलाप्रमाणे भ्रष्टाचाराची रक्कम वसूल करण्यासाठी शासनस्तरावर कोणतीही कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१२-११-२०२१) :** (१), (२) व (३) या संदर्भात तक्रार प्राप्त झाली असून सदर प्रकरणी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून दिनांक १ जानेवारी, २०१८ ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधी दरम्यान राबविण्यात आलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षणाबाबतचा सविस्तर वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती विभागात सहाय्यक गटविकास अधिकारी (एबीडीओ) ची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४८) १०२४८ (२७-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती विभागात मागील पाच वर्षाच्या कालावधीत पंचायत समित्या स्तरावरील विस्तार अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याची प्रक्रिया प्रलंबित असल्याने सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यांची (एबीडीओ) ३४ पदे रिक्त असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यात ग्रामविकास योजनांची अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहाय्यक गटविकास अधिकारी (एबीडीओ) ची सर्व रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२६-११-२०२१) :** (१) अमरावती विभागातील सहायक गट विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबत, पदोन्नती समितीची बैठक झाली असून, पदोन्नती देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.

अमरावती विभागातील रिक्त असलेल्या सहायक गट विकास अधिकारी या पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपवून, पाचही जिल्ह्यातील ग्रामविकास योजनांची अंमलबजावणी यशस्वीपणे करण्यात आली आहे.
(३) राज्यातील सहायक गट विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी, सन-२०१९ च्या परीक्षेनुसार एकूण-११ उमेदवारांची निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने केली आहे. सन-२०२० मध्ये १२ पदे व सन-२०२१ मध्ये १७ पदांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात देवून, भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. तसेच निम्न संवर्गातून सहायक गट विकास अधिकारी पदावर पदोन्नती देण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकांना एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबत

**(४९) ४०२५१ (०५-०४-२०१८) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे : दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक १५२२५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी नक्षलग्रस्त भागात शिक्षक एकस्तर लाभापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार एकस्तरच्या लाभापासून शिक्षक वंचित राहू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (३०-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यातील आदिवासी/नक्षलग्रस्त भागात सेवारत असणाऱ्या राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय करावयाच्या सुधारीत सवलतींबाबत सर्वसमावेशक सूचना निर्गमित करावयाची बाब सामान्य प्रशासन विभागाच्या विचाराधिन आहे. सा.प्र.वि. कडून याबाबत उचित निर्णय झाल्यानंतर या विभागाकडून योग्य ती कार्यवाही केली जाईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नेरळ (जि.रायगड) शहरात वायू प्रदूषण होत असल्याबाबत

**(५०) ४०८७२ (०४-०४-२०१८) श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेरळ (जि.रायगड) येथील अनेक ठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जात नसून डंपिंग ग्राउंडमध्ये आग लागून नेरळ शहरात वायू प्रदूषण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी नेरळ ग्रामपंचायत कोणतीही कार्यवाही करत नसल्याने तेथील नागरिक त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ओला व सुका कचरा वेगळा करून त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावावी अशा सूचना देण्यात आल्या असतानाही ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२६-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) अशी बाब नाही. ग्रामपंचायत नेरळ यांच्याकडून कचऱ्याची विल्हेवाट व कचरा उचलण्यासाठी वाहन व कर्मचाऱ्यांची व्यवस्था केली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) वायुप्रदुषणाची बाब आढळून आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.